Estd. 1962
NAAC "A" Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## परिपत्रक

सर्व संलग्न महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक/ मान्यता प्राप्त संस्था यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, सन 2018–19 या शैक्षणिक वर्षामधील आपल्या महाविद्यालयातील सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांकडून खालील प्रमाणे अग्रणी योजना शुल्क आकारण्यात यावे.

| No. | College | Fees Per Student per academic year |
|---|---|---|
| 1. | Arts., Science & Commerce Colleges | Rs. 25/- |
| 2. | Law, Education & Physical Education and Management Institutions | Rs. 50/- |
| 3. | Engineering, Technology & Pharmacy Colleges | Rs. 100/- |

वरीलप्रमाणे आपल्या महाविद्यालयात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांकडून जमा झालेले अग्रणी महाविद्यालय शुल्क सोबत जोडलेल्या विहीत नमून्यातील तक्त्यातील माहितीसह **मा. वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांचे नांवे धनाकर्षाद्वारे/रोखीने A 2 R 10 या अंदाजपत्रकीय शिर्षकाचा उल्लेख पत्रात करून विद्यापीठ कार्यालयाकडे जमा करणेत यावी. सदरचे शुल्क जमा करतेवेळी खालील बाबींचे काटेकोर पालन करावे.

1. अग्रणी योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टिकोनातून सर्व महाविद्यालयांनी जमा झालेल्या अग्रणी शुल्काची रक्कम विद्यापीठ कार्यालयास विहीत मुदतीत पाठवून द्यावी जेणेकरून सदरच्या रक्कमेची ९०टक्के रक्कम संबंधित अग्रणी महाविद्यालयास वर्ग करणे सोयीचे होईल.
2. सोबतचा **विहीत नमुना** शुल्कासोबत या कार्यालयाकडे पाठविणे **अनिवार्य** आहे.
3. अग्रणी शुल्क खालील प्रमाणे पाठवावे :

i) ज्या विद्यार्थ्यांनी **31 जूलै अखेर** महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे अशा विद्यार्थ्यांचे संपूर्ण अग्रणी महाविद्यालय शुल्क विद्यापीठास पाठविण्याची अंतीम मुदत **5 ऑगस्टपर्यंत राहील.**

ii) ज्या विद्यार्थ्यांनी **31 ऑगस्ट** अखेर महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे अशा विद्यार्थ्यांचे संपूण अग्रणी महाविद्यालय शुल्क विद्यापीठास पाठविण्याची अंतीम मुदत **5 सप्टेंबर** पर्यंत राहील.

iii) येथुन पुढे **31 ऑगस्ट** नंतर प्रवेशित होणा–या विद्यार्थ्यांकडून जमा होणारे अग्रणी शुल्क, अग्रणी महाविद्यालय शिखर समितीमध्ये ठरलेनुसार प्रवेश प्रकिया संपलेबरोबर 15 दिवसाच्या आत विद्यापीठ कार्यालयात जमा करावी. जी महाविद्यालये सदरची रक्कम विहीत मुदतीत कार्यालयास जमा करणार नाहीत अशा महाविद्यालयांकडून सदर रक्कमेवर द.सा.द.शे. 15 टक्के दराने दंड आकारला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

विद्यार्थी निहाय जमा करण्यात आलेल्या रक्कमेपैकी 10% शुल्क विद्यापीठाकडे जमा राहील व उर्वरित 90 % शुल्क अग्रणी महाविद्यालयांद्वारे आयोजित विविध योजनांवरील खर्चासाठी विद्यापीठाकडून अग्रणी महाविद्यालयास पाठविण्यात येईल.

उपकुलसचिव

संदर्भ क. शिवाजीवि/नॅक/अग्रणी/72
दिनांक :– 11 जुन 2018

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था**

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com